हैं तय्यार हम...

Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon
A LOKMAT INITIATIVE
21km
17 Dec 2017
Associate Sponsor riso
Powered by DHOOT TRANSMISSION
#MahaMarathon /MahaMarathon

नव्या ऊर्जेचा संचार

लोकमत महामॅरेथॉन स्पर्धेमुळे औरंगाबाद शहरात एक नवी ऊर्जा संचारलेली आहे. सर्वांना आता १७ डिसेंबर रोजीच्या रविवारच्या सकाळचे वेध लागले आहेत. सर्वच स्तरातून मिळत असलेला प्रतिसाद पाहता यंदाची स्पर्धा गेल्या वर्षीच्या स्पर्धेचा विक्रम मोडीत काढेल, असे दिसतेय. आता केवळ १० दिवस शिल्लक असून तयारी जोरात सुरु आहे.

- **सचिन मलिक**, संचालक, फर्स्ट आयडिया एज्युकेशन

आरोग्याविषयी जनजागृती होणार

एक डॉक्टर म्हणून मी सांगू शकतो की, मॅरेथॉनमुळे शहरवासीयांमध्ये फार सकारात्मक पद्धतीने आरोग्याविषयी जागृती होण्यास मदत मिळणार आहे. मॅरेथॉनसाठी लोक तयारी म्हणून व्यायाम करीत आहेत, आहारावर लक्ष देत आहेत, वजन कमी करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत आणि जेव्हा हजारोंच्या संख्येने लोक एकत्र येतात तेव्हा फार चांगला संदेश समाजात जातो.

- **डॉ. हिमांशू गुप्ता**, प्रशासक धूत हॉस्पिटल



पैठण येथील महिलांचा ग्रुप... (डावीकडून) सारिका लखमले, डॉ. उषा शिंदे, अलका चन्ने, अश्विनी लखमले, डॉ. शीतल चमटे, नम्रता पटेल, डॉ. बबिता गायकवाड, डॉ. सुनंदा खणसे.

बळीराम पाटील विद्यालय ग्रुप... मुख्याध्यापक एन. बी. गाडेकर, एम. के. चव्हाण, गणपत पवार यांच्यासह बळीराम पाटील विद्यालयातील विद्यार्थिनी.

T-Shirt Partner: SANDIP UNIVERSITY
Co-Sponsors: PRIDE CENTURY, SARA
In Association with: WOCKHARDT, LiFE WiNS, varroc
Food & Beverage Partner: Frut-X
Official Energy Drink Partner: Enerzal
Sporting Accommodation Partner: istay sporty
Health & Drink Partner: Vedika
Outdoor Partner: abhishek
Healthcare Partners: VIDEOCON SETH NANDLAL DHOOT HOSPITAL, CIGMA HOSPITAL
Race Management: YOU TOO CAN RUN
Health & Fitness Partner: RELAX-ZEAL
Water Partner: COOLZY
Supported by: AURANGABAD MUNICIPAL CORPORATION, AURANGABAD
Banking Partners: Bank of Baroda, Bank of India
Sound Partner: S.S.PRO, Northern Pro Lights
Power Partner: PAGARIYA AUTO
Mall Partner: PROZONE
Waste Management Partner: CRT
Sports Partners

भय्यासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त एकवटले कार्यकर्ते

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : 'सूर्यपुत्र यशवंतराव ऊर्फ भय्यासाहेब आंबेडकर जयंती'निमित्त सर्व आंबेडकरी पक्ष संघटनांनी संपूर्ण ताकदीनिशी एकत्रितपणे महोत्सवामध्ये सहभागी होण्याचा निर्धार रविवारी पीईएस शारीरिक शिक्षण महाविद्यालयात झालेल्या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

या बैठकीत रिपब्लिकन सेनेचे के. व्ही. मोरे, भारिपचे गौतम लांडगे, ज्येष्ठ नेते दिनकर ओंकार, माजी नगरसेवक बंडू प्रधान, रिपाइंचे जि. प. सदस्य रमेश गायकवाड, रामभाऊ पेरकर, रमेशभाई खंडागळे, श्रावण गायकवाड, भारतीय बौद्ध महासभेचे अशोक कांबळे बौद्ध, जालिंदर शेंडगे, माजी नगरसेवक गौतम खरात, स्वारीपचे सर्जेराव मनोरे, भीमसेन कांबळे, मुप्टाचे शंकर अंभोरे, देवानंद वानखेडे, प्राचार्य निरानंद बेहरा, प्राचार्य बी. एस. गंगावणे, डॉ. राजेंद्र वाघ, डॉ. मंगेश घुसळे आदींसह विविध पक्ष संघटनांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत सर्वसमावेशक महोत्सव साजरा करण्याचा संकल्प करण्यात आला.

नागसेनवनातील सर्व महाविद्यालयांच्या वतीने हा महोत्सव आयोजित करण्यात आला असल्याने पहिल्यांदाच सर्व संघटनांनी या आवाहनाला प्रतिसाद दिला.

दिलासा : कागदी प्रमाणपत्र सांभाळण्याच्या त्रासापासून सुटका

आरटीओत 'स्मार्ट आरसी' वितरणास अखेर सुरुवात

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : आरटीओ कार्यालयात अखेर वाहन नोंदणी प्रमाणपत्र (आरसी) स्मार्ट कार्डच्या स्वरुपात देण्यास सोमवारपासून सुरुवात झाली. गेल्या तीन वर्षांपासून हजारो, लाखो रुपयांच्या वाहनांची नोंदणी प्रमाणपत्रे अवघ्या ५० पैशांच्या कागदावर दिली जात होती; परंतु आता पुन्हा एकदा वाहनधारकांच्या हातात 'स्मार्ट आरसी' पडणार आहे.

मुंबई, पुण्यासह अन्य काही शहरांतील आरटीओ कार्यालयात स्मार्ट कार्ड स्वरुपात वाहन नोंदणी प्रमाणपत्र देण्यास सुरुवात झाली; परंतु औरंगाबादकरांना त्याची नुसती प्रतीक्षा करावी लागली. कागदी प्रमाणपत्रांमुळे वाहनधारकांना होणाऱ्या त्रासाविषयी 'लोकमत'ने ३१ ऑक्टोबर रोजी 'महागड्या वाहनांची नोंदणी ५० पैशांच्या कागदावर' या मथळ्याखाली सविस्तर वृत्त प्रकाशित केले.

वृत्त प्रकाशित होताच गेल्या महिनाभरात स्मार्ट कार्ड स्वरुपात आरसी बुक देण्यासाठी प्रशासनाने वेगाने हालचाली केल्या. संगणक, प्रिंटर, कर्मचारी अशी यंत्रणा दाखल झाली. स्मार्ट आरसी बुकसाठी शुल्कात बदल करण्यात आला. गेली दोन ते तीन दिवस प्रलंबित असलेल्या सर्व वाहनांचे नोंदणी प्रमाणपत्र देण्याचे काम प्राधान्याने पूर्ण करण्यावर भर देण्यात आला. तीन वर्षांनंतर आरटीओ कार्यालयात पुन्हा एकदा स्मार्ट कार्डात आरसी देण्यास सुरुवात झाली.

आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर सोमवारपासून स्मार्ट कार्डच्या स्वरुपात आरसी बुक देण्यास सुरुवात केल्याचे सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी रमेशचंद्र खराडे यांनी सांगितले. तीन वर्षांपासून स्मार्ट कार्ड स्वरुपातील आरसी बुकसाठी ३९५ रुपये आकारण्यात येत होते. परंतु आता त्यासाठी २०० रुपये घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

स्मार्ट कार्डची प्रतीक्षा : मुंबईसह अन्य आरटीओत सुरुवात, औरंगाबादकडे दुर्लक्ष
महागड्या वाहनांची नोंदणी ५० पैशांच्या कागदावर
Maharashtra State Certificate of Registration
ए-४ आकारातील कागद
वेळेवर कागदपत्रांसाठी सुरुवात

३१ ऑक्टोबर रोजी प्रकाशित वृत्त.

'कार्ड रिडर'चा अभाव

- स्मार्ट कार्डमध्ये आरसी बुक देण्यास सुरुवात झाली. स्मार्ट कार्डचे वैशिष्ट्य म्हणजे कार्डवर असलेली 'चीप'. यात व्यक्तीचे नाव, पत्ता, वय, परवाना देणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व इतर माहिती दिलेली आहे. स्मार्ट कार्डधारकाचा अपघात झाल्यास संबंधित व्यक्तीची इतरही माहिती या चीपवरुन मिळते.
- परंतु या कार्डमधील अधिक माहिती जाणून घेण्यासाठी आवश्यक असलेले 'कार्ड रिडर' आरटीओ कार्यालयापासून अन्य कोणत्याही यंत्रणेकडे उपलब्ध नसल्याचे समजते. स्मार्ट कार्डवरील माहितीचा आधार घेण्याशिवाय पर्याय नाही. अधिक माहिती हवी असल्याने आरटीओ कार्यालयातून घेण्याची वेळ येणार आहे.

Govt Reg.No.7342
पेन केअर इंस्टीट्युट
ऑर्थोपेडीक सर्जन द्वारे सल्ला व उपचार
सांधेवात, गुडघेदुखी, मान, पाठ, कंबरदुखी मायग्रेन (डोकेदुखी), फ्रोझन शोल्डर (खांदेदुखी) सायटीका, स्लिप डिस्क, टाचदुखी, टेनिस ऐल्बो हातापायात मुंग्या येणे आता अत्याधूनिक विना दुष्परिणाम बोटॉक्स इंजेक्शन उपचारा द्वारा वेदनेपासुन मुक्ती मिळवून आपण गुडघ्याचे व पाठीचे ऑपरेशन काही काळास्तव टाळू शकता.
अपना बाजार, बाफना ज्वेलर्स समोर, जालना रोड, औरंगाबाद.
9822899660, 9422713387, 9767442040
(कृपया अपॉईंटमेंट घेऊनच येणे)
सोमवार ते शुक्रवार फक्त

सिडकोकडून पाच कोटी कपात

मनपात खळबळ : परस्पर रक्कम वळती केली

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : सातारा-देवळाई येथील विकास शुल्कापोटी मिळालेल्या १३ कोटी रुपयांमधील ५ कोटी रुपये सिडको प्रशासनाने परस्पर वळती करुन घेतले. झालर विकास आराखडा आणि सिडको नाट्यगृहाच्या कामापोटी ही रक्कम वळती केल्याचे सिडकोकडून मनपाला सांगण्यात आले. पाच कोटी रुपये कपात झाल्याचे कळताच महापालिकेत एकच खळबळ उडाली. ही रक्कम परत मिळावी म्हणून महापौर नंदकुमार घोडेले यांनी सिडको प्रशासनाकडे जोरदार शिष्टाई सुरु केली आहे.

सातारा-देवळाईचा विकास आराखडा तयार करण्यासाठी शासनाने सिडको प्रशासनाची नियुक्ती केली होती. या भागातील बांधकाम परवाने देण्याची जबाबदारी सिडकोवर होती. दोन वर्षांपूर्वी सातारा-देवळाई नगरपालिका बरखास्त करुन शासनाने हा परिसर महापालिकेत समाविष्ट केला.

सिडकोकडे या भागातील विकास शुल्कापोटी जवळपास १३ कोटींची रक्कम वसूल केली होती. त्यातील आठ कोटी सिडकोने महापालिकेला दिले आहेत. या निधीतून मनपाने सातारा-देवळाई येथील विकास कामे सुरु केली. सिडकोकडून उर्वरित ५ कोटी रुपये मिळविण्यासाठी मनपा अधिकाऱ्यांनी जोरदार प्रयत्न सुरु केले. सिडको प्रशासनाने पाच कोटींची रक्कम देण्यास नकार दिला आहे. ही रक्कम वळती करुन घेण्यात आल्याचे महापालिका अधिकाऱ्यांना सांगण्यात आले.

सिडकोने सातारा-देवळाईचा झालर विकास आराखडा तयार केला. त्यासाठी व नाट्यगृहापोटी निधी वळता करण्यात आल्याचे सांगण्यात आले. ही बाब महापौर नंदकुमार घोडेले यांना माहीत होताच त्यांनी सिडकोचे मुख्य प्रशासक ओम प्रकाश बकोरिया यांच्याशी चर्चा केली. त्यांनी यासंदर्भात दोन्ही विभागांच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन निर्णय घेण्याचे आश्वासन दिले.

माहेश्वरी बहू मंडळातर्फे कार्यशाळेचे आयोजन

औरंगाबाद : माहेश्वरी बहू मंडळातर्फे दि. १२ ते १७ डिसेंबर या काळात महिलांसाठी योगा, प्राणायाम, ध्यानधारणा, सुदर्शनक्रिया आदींविषयी माहितीपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. पुंडलिकनगर परिसरात ही कार्यशाळा होणार असून, प्रवेश सर्व महिलांसाठी खुला आहे, अशी माहिती डॉ. कल्पना परदेशी, दीपिका बांगड, नंदा नावंदर यांनी दिली.

आता प्रथमच सेक्स समस्यांवर अत्याधुनिक विदेशात प्रचलित लेझर व व्हॅक्युम थेरेपी उपचार
विवाहापुर्वी व विवाहानंतर समस्यांसाठी एम.बी.बी.,एस.एम.डी. डॉक्टरांचा सल्ला
हस्तमैथुन, स्वप्नदोष, विर्यदोष, शिघ्रपतन, इंद्रीय शिथिलता, पुरुष वंधत्व
हायपोगोनॅडिझममुळे इंद्रीय समस्या, मधुमेहामुळे आलेली लैंगिक शिथीलता
ऑलीगोस्पर्मीया : शुक्रजंतुची संख्या कमी असणे. ॲझुस्पर्मीया: शुक्रजंतुची संख्या अजीबात नसणे.
आशाकिरण क्लिनीक
१९८५ पासुन शास्त्रीयोक्त मार्गदर्शन केंद्र
३८, निराला बाजार, बाटा शोरुम समोर, औरंगाबाद. वेळ - स.११ ते ३ व सायं.७ ते ९ शनिवार रविवार बंद
कृपया अनावश्यक खर्चीक व फसव्या उपचारापासुन सावध मो. 7769856821 9767132521

सिंचनच्या 'त्या' फायलींचा गुंता सुटेना

जि.प.मध्ये पेच वाढला : विभागीय आयुक्तांकडूनही मिळेना मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : सिंचन विभागातील 'त्या' ५२ फायलींचा गुंता अद्यापही सुटलेला नाही. ५२ पैकी २९ कामे पूर्ण झाली असून, सदरील कामांची बिले निकाली काढण्यासाठी जि.प. प्रशासनाने विभागीय आयुक्त कार्यालयाकडून मार्गदर्शन मागविले होते. त्यास २० ते २५ दिवसांचा कालावधी लोटला तरी ते अद्याप प्राप्त झालेले नाही. तथापि, आयुक्तांकडून मार्गदर्शन प्राप्त झाले की, जिल्हा नियोजन विभागाकडून मागील वर्षी प्राप्त झालेल्या निधीतून २९ कामांची बिले दिली जातील, अशी माहिती मुख्य लेखा व वित्त अधिकारी जे. बी. चव्हाण यांनी दिली.

वित्त विभागाची परवानगी न घेताच तत्कालीन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सिंचन विभागाच्या ५२ कामांना कार्यारंभ आदेश दिले होते. यापैकी ३१ मार्चअखेरपर्यंत २९ कामे पूर्ण झाली होती. त्यानंतर संबंधित कंत्राटदारांनी बिले सादर केली; परंतु अध्यक्षा देवयानी पाटील डोणगावकर यांनी ३१ मार्चच्या शेवटच्या आठवड्यात कार्यारंभ आदेश दिलेच कसे, हा मुद्दा ताणून धरला होता. यासंदर्भात तत्कालीन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश बेदमुथा, सिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता विनायक पांढरे यांना दोषी धरुन मुख्य कार्यकारी अधिकारी मधुकरराजे आर्दड यांनी या प्रकरणाचे तथ्य शोधनासाठी चौकशी समिती नेमली. या अनियमितेस बेदमुथा व पांढरे हेच सर्वस्व जबाबदार आहेत, या चौकशी समितीच्या या अहवालानुसार बेदमुथा व पांढरे या दोघांनाही प्रशासनाने सक्तीच्या रजेवर पाठविले.

ही सर्व प्रक्रिया सुरु असताना ५२ पैकी सिमेंट बंधाऱ्यांची २९ कामे पूर्ण करुन संबंधित कंत्राटदारांनी सिंचन विभागाकडे बिले सादर केली. दरम्यानच्या काळात सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात जिल्हा नियोजन समितीकडून मिळालेला निधी मार्चअखेर अखर्चित राहिला होता.

कंत्राटदारांची बिले तर द्यावीच लागतील

1. यासंदर्भात मुख्य लेखा व वित्त अधिकारी जे. बी. चव्हाण यांनी सांगितले की, काहीही झाले तरी जिल्हा परिषदेला कंत्राटदारांची बिले अदा करावीच लागतील. मागील आर्थिक वर्षात 'डीपीसी'कडून मिळालेल्या निधीतून २९ कामांची बिले दिली जातील. यासाठी आयुक्त कार्यालयाची सहमती घेण्यात येणार आहे. ५२ फायलींमध्ये झालेल्या अनियमिततेसंबंधी विद्यमान अधिकाऱ्यांमार्फत त्रुटींची पूर्तता करण्यात आली आहे.
2. तथापि, अर्थ समितीचे सभापती विलास भुमरे म्हणाले की, 'डीपीसी'कडून प्राप्त निधी अखर्चित राहिल्यामुळे सिंचन विभागाने तो लघुसिंचन स्थानिकस्तर विभागाकडे ३१ मार्च रोजी वर्ग केला. वास्तविक पाहता हा निधी वर्ग न करता 'डिपॉझिट' करायला हवा होता. वित्त विभागाच्या या चुकीमुळे ५२ निविदांचे दायित्व जिल्हा परिषदेवर वाढले आहे.

गतिमंदांची उत्पादने घेऊ लागली गती : नवजीवन मतिमंद शाळेचा उपक्रम

स्पेशल पार्ट्या व कॉर्पोरेटने दिला रोजगार

साहेबराव हिवराळे | लोकमत न्यूज नेटवर्क

औरंगाबाद : समाजाने गतिमंद ठरविले असले तरी गतिमंदांची उत्पादने गती घेऊ लागली आहेत. स्पेशल पार्ट्या, समारंभ, कॉर्पोरेट सेक्टरला या गतिमंदांच्या उत्पादनांनी मोहिनी घातली आहे. त्यातून आर्थिक व सामाजिक स्थैर्य निर्माण करण्यासाठी यातून मोठा आधार मिळत आहे.

चिकलठाणा एमआयडीसीतील नवजीवन मतिमंद शाळेत शैक्षणिक उपक्रमासह कार्यशाळेतून या मुलांच्या बुद्धिमत्तेत वाढ करण्याचा व त्यांचा विकास करण्याचा प्रयत्न केला जात आहे. शारीरिकदृष्ट्या वाढ झालेल्या मुलांच्या बुद्धिमत्तेत वाढ करुन त्यांच्या हाताला चांगले वळण देण्यात या संस्थेने पुढाकार घेतला आहे.

येथील गतिमंद मुले कौशल्य पणाला लावून हसत-खेळत 'कँडी व चॉकलेट' बनविण्यात तरबेज झाली आहेत. या मुलांची दिनचर्या ठरलेली असून, त्यांना सकाळपासून ते झोपेपर्यंत मार्गदर्शन केले जाते. त्यांची बौद्धिक क्षमता वाढविण्यासाठी विविध स्तरातील समविचारी जानकारांनी मिळून ही संस्था स्थापन केली आहे. ती अविरत या मुलांच्या विकासासाठी कार्यरत आहे.

गतिमंदांनी कौशल्य वापरुन तयार केलेली चॉकलेटची उत्पादने अशा आकर्षक पद्धतीने सजवून ठेवली आहेत.

कार्यशाळेतून मिळाला रोजगार...

आपण घरातील नातेवाईक व आप्तांवर विसंबून राहिलेलो नसल्याचा भास या मुलांना होत आहे. कागदी पिशव्या, कारखाने व कार्यालयात लागणाऱ्या स्टेशनरीदेखील या मुलांकडून पुरविल्या जात आहेत. कॉर्पोरेट सेक्टरमधील काही कारखाने या मुलांकडून चॉकलेट, कॅन्डी समारंभासाठी, तसेच कार्यालयासाठी स्टेशनरीची सतत मागणी करीत आहेत.

ताठ मानेने जगण्यासाठी धडपड

सामाजिक व आर्थिक स्थैर्य या मुलांत निर्माण करण्यासाठी सतत प्रयत्न केले जात असून, बौद्धिक क्षमता वाढीसाठी एकमेव उपक्रम कार्यशाळा आहे. होम सायन्स, शिवणकला, आर्ट डिझाइन अशा विविध कलागुणांना वाव देण्यात येत आहे, असे डॉ. रामदास अंबुलगेकर यांनी सांगितले.

गतिमंदांची गती वाढविणारे शिल्पकार

शाळेतील मुलांनी तयार केलेली उत्पादने कॉर्पोरेट सेक्टरच्या काही अधिकाऱ्यांनी पाहिली. त्यांनी दरवर्षी या मुलांच्या वर्कशॉपमधूनच उत्पादने घेण्याचे ठरविले आहे. या मुलांचे कौशल्य विकसित करुन त्यांच्या हाताला व बुद्धीला वळण देण्याचे काम चित्रा सुरडकर, शीला तुमराम, त्र्यंबक कुलकर्णी, प्रशांत सराफ, अभिजित जोशी सातत्याने करीत आहेत.

गुणवत्तेमुळे गोडी वाढली...

या मुलांची उत्पादने एका ठराविक काळात तयार केली जातात, त्याची गोडी कॉर्पोरेट सेक्टर आणि उच्चभ्रू सोसायटीत अधिक वाढली आहे. उत्पादनाचे कार्य अगदी टीमवर्क असून, सततच्या कामामुळे त्यांच्या बुद्धिमत्तेतदेखील भर पडल्याचे जाणवते.

पाककृती अत्यंत देखरेखीखाली तंत्रशुद्ध पद्धतीने केली जाते. बुध्यांकानुसार या मुलांचीही वर्गवारी केली जाते. चॉकलेटच्या सजावटीपासून पार्सल पोहोचविण्यापर्यंत ही मुले अगदी तरबेज आहेत, असे चित्रा सुरडकर यांनी सांगितले. आईला घरात भाजी निवडणे, कांदा, लसूण, मिरची, धुणे, झाडू, तसेच किरकोळ कामेदेखील ही मुले प्रामुख्याने करीत असल्याने त्यांचा घरातील वावर वाढला आहे.

Mall Partner PROZONE LIFE BEGINS HERE
लोकमत
Brought to you by SAFFRON LANDMARKS
Aurangabad Maha Marathon
A LOKMAT INITIATIVE
21km
17 Dec 2017
Associate Sponsor riso
Powered by DHOOT TRANSMISSION
प्रिय धावक, आपण सस्नेह आमंत्रित आहात
फिटनेस पार्टी
by #Maha Marathon
एक्स्ट्रिम फिटनेस : • भांगडा • झुंबा • पिलोझिंग
• मसाला बॉलीवूड आणि भरपूर काही
औरंगाबाद महामॅरेथॉन धावपटूकरिता
औरंगाबादच्या भव्य फिटनेस पार्टीच्या प्रवेशिका
रिगल लॉन, लोकमत भवन, जालना रोड
आणि प्रोझोन मॉल येथे मिळतील
Aurangabad Maha Marathon A LOKMAT INITIATIVE 21km FINISHER
बुधवार, १३ डिसेंबर २०१७ । सायं. ६ वाजेपासून
प्रोझोन मॉल लॉन, चिकलठाणा, औरंगाबाद
सूचना : • केवळ पासद्वारे प्रवेश दिला जाईल
• कार्यक्रमाचे सर्व हक्क आयोजकांकडे राखीव आहेत • संपर्क : 0240-3021708
Food & Beverage Partner: Naturo Feels
Health & Fitness Partner: RELAX-ZEAL
T-Shirt Partner: SANDIP UNIVERSITY
Co-Sponsors: PRIDE CENTURY, SARA
In Association with: WOCKHARDT, LiFE WiNS, varroc
Food & Beverage Partner: Frut-X
Official Energy Drink Partner: Enerzal
Sporting Accommodation Partner: istay sporty
Health & Drink Partner: Vedika
Outdoor Partner: abhishek
Healthcare Partners: VIDEOCON SETH NANDLAL DHOOT HOSPITAL, CIGMA HOSPITAL
Race Management: YOU TOO CAN RUN
Water Partner: COOLZY
Banking Partners: Bank of Baroda, Bank of India
Sound Partner: S.S.PRO, Northern Pro Lights
Power Partner: PAGARIYA AUTO
Waste Management Partner: CRT
Sports Partners